महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION
AMRAVATI DIVISIONAL BOARD, AMRAVATI.444 602.

पत्र क्र. अविमं/माप/ १४६०
अमरावती, दिनांक - ४/१०/२४

प्रति,
मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय-** फेब्रु/मार्च-२०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत..
**संदर्भ** -क्र.रा.मं/परीक्षा-३/३८८२, दिनांक ०३/१०/२०२४

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, फेब्रु/मार्च-२०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेत येणा-या वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी व मंडळास सहकार्य करावे. ही विनंती.

सहपत्र-प्रकटनाची एकूण प्रत-०१

(निलीमा टाके)
विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

प्रतिलीपी- मुख्याध्यापक ,सर्व मान्यताप्राप्त शाळा, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या प्रकटनानुसार कार्यवाही करावी व संबंधित शिक्षक, विद्यार्थी, पालक व इतर घटकांना अवगत करावे.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४

### ।। प्रकटन ।।

### माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे सादर करावयाच्या तारखांबाबत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे Saral Database वरुन ऑनलाईन पध्दतीने त्यांचे शाळा प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

तसेच पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ने विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने त्यांच्या शाळा प्रमुखांमार्फत भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे –

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे SARAL DATABASE वरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा तसेच पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी तसेच ITI(औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा |
|---|---|
| नियमित शुल्क | सोमवार, दिनांक ०७/१०/२०२४ ते मंगळवार, दिनांक ०५/११/२०२४ |

**माध्यमिक शाळांनी परीक्षा शुल्क RTGS द्वारे भरणा करणे व RTGS/NEFT पावती/चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट जमा करावयाची तारीख नंतर कळविण्यात येईल याची सर्व माध्यमिक शाळा प्रमुख यांनी नोंद घ्यावी.**

सर्व माध्यमिक शाळांनी आवेदनपत्रे भरण्यापूर्वी School Profile मध्ये शाळा, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची योग्य माहिती भरुन मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांच्या लॉगिन (School Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल. माध्यमिक शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत मुख्याध्यापक यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १० वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्र त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे –

१ माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी Saral Database मध्ये विद्यार्थ्यांची अद्ययावत नोंद असणे आवश्यक आहे व सदर Saral Database वरुनच नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्याची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे.

२ पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) यांची माहिती Saral Database मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने निश्चित केलेल्या तारखांना ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत.

३ कौशल्य सेतू अभियानाचे Transfer of Credit मागणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरून विषयासमोर Transfer of Credit ची नोंद करावी. याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांनी प्रचलित पध्दतीने आवेदनपत्र व आवश्यक कागदपत्रे यांची हार्ड कॉपी (Hard Copy) विभागीय मंडळात जमा करावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

दिनांक – ०३/१०/२०२४

E:\Pardeshi1\Avedanpatra\FebMar25\SSC.docx2